मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

**राज्य मराठी विकास संस्था**
(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१.
रजि नं. एफ १६०९४ (मुंबई)
दूरध्वनी : २२६३१३२५/ फॅक्स : २२६५३९६६
Email : rmvs_mumbai@yahoo.com

क्र.रामविसं/घ.दु.२०१५/प्र.क्र.४०/ आस्था/ ७७ /२०१६

दि. २९.१.२०१६

# राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

## घटना दुरुस्ती २०१६

## नियम व विनियम

१. (अ) १. या नियमांना राज्य मराठी विकास संस्था (सुधारित) नियम, २०१६ असे म्हणण्यात येईल.

२. ते दिनांक २९.१.२०१६ पासून अंमलात येतील.

२. सन २०१० पासून मराठी भाषा विभाग हा स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून अस्तित्वात आला असल्याने राज्य मराठी विकास संस्था सामान्य प्रशासन विभागाऐवजी मराठी विभागाच्या अधिनस्त संस्था म्हणून कार्यरत आहे. संस्थेच्या प्रशासकीय विभागात झालेल्या या बदलाच्या अनुषंगाने संस्थेच्या सध्या अंमलात असलेल्या सन २००२ च्या घटनेतील कलम ४४ व कलम २१ मध्ये विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करून परिपत्रक ठरावाद्वारे नियामक मंडळाच्या मान्यता घेऊन, कलम ७ व २४ (क) मध्ये खालील प्रमाणे घटना दुरूस्ती करण्यात येत आहे.

कलम (७) नियामक मंडळाचे पदसिद्ध सदस्य अनु क्र. २ येथे शिक्षणमंत्री (शालेय शिक्षण) महाराष्ट्र राज्य, उपाध्यक्ष याऐवजी **मा.मंत्री मराठी भाषा विभाग, उपाध्यक्ष** व अनु क्र. ४ येथे प्रधान सचिव, सामान्य

प्रशासन विभाग, सदस्य याऐवजी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मराठी भाषा विभाग, सदस्य

कलम २४ (क) कार्यकारी समिती, रचना मध्ये येथे प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सदस्य याऐवजी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मराठी भाषा विभाग, सदस्य अथवा त्यांचा नामनिर्देशित अधिकारी सदस्य.

आनन्द काटीकर

(आनन्द काटीकर)

प्रभारी संचालक